राज्यातील ग्रामपंचायतीतील सदस्य/थेट सरपंच यांच्या निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे **रिक्त जागांच्या पोटनिवडणुकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम .......**

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.०२/का-८
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- १७/०३/२०२६
दूरध्वनी क्रमांक - ०२२-२२८४६७२०/२२८८६९५०
ई-मेल - sec.gp@mah.gov.in

प्रति
जिल्हाधिकारी *(सर्व)*,
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)*

**विषय :-** राज्यातील ग्रामपंचायतीतील सदस्य /थेट सरपंच यांच्या निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे **रिक्त जागांच्या पोटनिवडणुकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम .....**

संदर्भ -१. मतदार यादी ग्राहय धरण्याबाबतची राज्य निवडणूक आयोगाची क्र. रानिआ/जिपपंस-२०२५/ प्र.क्र.२०/का.०७,दि. २१ ऑगस्ट,२०२५ ची अधिसूचना

२. रिट याचिका क्र.६४१/२०२६ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक २३/०१/२०२६ रोजी दिलेले आदेश.

३. राज्य निवडणूक आयोगाचा समक्रमांकाचा दिनांक २९/०१/२०२६ चा मतदार यादी कार्यक्रम.

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे.

ii ) राज्यातील ग्रामपंचायतीतील सदस्य /थेट सरपंच यांच्या निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे दिनांक ३१/०१/२०२६ पर्यंत रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणूकांसाठी आयोगाच्या समक्रमांकाच्या संदर्भ क्र.३ वरील च्या आदेशान्वये अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

iii) यास अनुसरुन सोबतच्या परिशिष्ट २ मध्ये नमूद केल्यानुसार राज्यातील २४४४ ग्रामपंचायतीतील ४७१ थेट सरपंचाच्या व ३१२० सदस्यांच्या रिक्त जागांसाठी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली असून आता, या रिक्त जागांसाठी पोटनिवडणुकांचा कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

iv) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ ) मधील कलम १० अ पोटकलम (४) मधील अधिकारांचा वापर करुन, **दिनांक २४/०२/२०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द झालेल्या ग्रामपंचायतींमधील रिक्त जागांचा (सदस्य/थेट सरपंच) पोटनिवडणुक कार्यक्रम राबविण्यासाठी आदेशित करण्यात येत आहे.**

**<u>आदेश</u>**

१) **निवडणूक कार्यक्रम** – **परिशिष्ट १** मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार **परिशिष्ट २** मध्ये नमूद ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुका घेण्यात याव्यात.

**मात्र महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ११ (३) मधील तरतुदीनुसार ज्या ग्रामपंचायतीची मुदत समाप्त होण्यास (निवडणूक नोटीस प्रसिध्दीच्या दिनांकापासून) ६ महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे, अशा ग्रामपंचायतीतील रिक्त जागांचा समावेश या पोटनिवडणूक कार्यक्रमामध्ये करण्यात येऊ नये.**

२) **आचारसंहिता** – निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये, निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील. या क्षेत्रातील मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा मंत्री, खासदार, आमदार व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकाऱ्यांना आचारसंहिता कालावधीत कुठेही करता येणार नाही.

( आयोगाचे आचारसंहितेबाबतचे दि. ०४/११/२०२५ चे एकत्रित आदेश, दि.०६/०९/२०१७ चे अतिरिक्त आदेश व दिनांक १७/१२/२०२० चे पत्र )

३) **पारंपारिक पध्दतीने नामनिर्देशनपत्र** – या निवडणुकांसाठी नामनिर्देशनाची प्रक्रिया पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावी. जिल्हाधिकारी कार्यालयाने निवडणुक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र इत्यादी नमुने उमेदवाराकरीता उपलब्ध ठेवावेत.

४) **<u>जात प्रमाणपत्र सादर करण्यास मुभा</u>** – महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० – १ क व कलम ३० – १ क तरतुदीनुसार राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या इच्छूक व्यक्तींनी नामनिर्देशन पत्रासोबत जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. तथापि, **जात वैधताप्रमापत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी जात पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा जात पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य पुरावा नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. या संदर्भात राज्य शासनाच्या सन २०२५** चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८ , दिनांक २६ डिसेंबर, २०२५ अन्वये उमेदवाराने निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकांपासून सहा महिन्यांच्या आत,

पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. याबाबत उमेदवारांकडून नामनिर्देशपत्रासोबत विहित केलेले हमीपत्र घेण्यात यावे.

५) **मतदानाची वेळ** – परिशिष्ट १ येथील निवडणुक कार्यक्रमानुसार मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल. (मात्र नक्षलग्रस्त भागामध्ये उदा. गडचिरोली, गोंदीया करीता सकाळी ७.३० ते दुपारी ३.०० वा. पर्यंत)

६) **न्यायालयीन प्रकरण** – निवडणूक कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखादया ग्रामपंचायतींच्या निवडणूकी संदर्भात मा. न्यायालयाचे किंवा विभागीय आयुक्त (अपीलासंदर्भात) यांच्या स्तरावरुन देण्यात आलेले स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास,

- मा.न्यायालयाचे स्थगिती आदेशानुसार जिल्हाधिकारी यांना त्यांच्या स्तरावर स्थगितीची कार्यवाही करता येईल.
- मात्र विभागीय आयुक्त यांनी त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या अनर्हतेच्या प्रकरणांमध्ये निवडणूक कार्यक्रम सुरु झाल्यानंतर कोणत्याही प्रकारे स्थगिती देण्यात येऊ नये.

७) ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शी पध्दतीने पार पाडण्याच्या दृष्टीने आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या पूर्वतयारी आदेशातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

८) नवीनतम उपक्रम राबविण्यासंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

९) राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे -

| | |
|---|---|
| संकेत स्थळ | http://mahasec.maharashtra.gov.in |
| ई-मेल | sec.gp@mah.gov.in |

सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सोबत - परिशिष्ट - १ व परिशिष्ट २

१०.०३.२०२६

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग/वित्त विभाग तसेच सर्व प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

५. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
यांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करुन, त्यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावे.

६. विभागीय आयुक्त (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी

७. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

८. संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४
यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहित वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.

९. पोलिस महानिरीक्षक ( सर्व संबंधित), महाराष्ट्र राज्य

१०. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

१२. जिल्हा पोलिस अधिक्षक ( सर्व)

१३. उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

१४. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग

१५. राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.

१६. निवड नस्ती.

# परिशिष्ट १

(क्रमांक-रानिआ/ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.०२/का.०८,दिनांक१७/०३/२०२६ च्या आदेशासोबतचे सहपत्र)

**राज्यातील ग्रामपंचायतीतील सदस्य/ थेट सरपंच यांच्या निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा निवडणूक कार्यक्रम**

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ३०/०३/२०२६ (सोमवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दिनांक ०७/०४/२०२६ (मंगळवार) ते दिनांक १३/०४/२०२६ (सोमवार) वेळ स.११.०० ते दु.३.०० (दिनांक ११/०४/२०२६ चा शनिवार व दिनांक १२/०४/२०२६ चा रविवार वगळून) |
| ३ | नामनिर्देशनपत्र छानननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दिनांक १५/०४/२०२६ (बुधवार) वेळ सकाळी ११.०० वा.पासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दिनांक १७/०४/२०२६ (शुक्रवार) दुपारी ३.०० वा. पर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक १७/०४/२०२६ ( शुक्रवार ) दुपारी ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दिनांक २८/०४/२०२६ (मंगळवार) सकाळी ७.३० वा. पासून ते सायं. ५.३० वा. पर्यंत (नक्षलग्रस्त व दुर्गम भागासाठी उदा. गडचिरोली, गोंदीया जिल्ह्यासाठी सकाळी ७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत) |
| ७ | मतमोजणी व निकाल घोषित करण्याचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील) | दिनांक २९/०४/२०२६ (बुधवार) |
| ८ | जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०६/०५/२०२६ (बुधवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

१७.०३.२०२६

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

( क्रमांक - रानिआ/ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.०२/का.०८, दिनांक १७/०३/२०२६ च्या आदेशासोबतचे सहपत्र )

## परिशिष्ट २

### रिक्त जागांच्या पोटनिवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींचा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार तपशिल

| अ.क्र. | जिल्हा | एकूण ग्रामपंचायतींची संख्या | थेट सरपंच रिक्त जागांची संख्या | सदस्य रिक्त जागांची संख्या | एकूण रिक्त जागांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | ७८ | १५ | १०१ | ११६ |
| २ | पालघर | १२७ | १५ | १६८ | १८३ |
| ३ | रायगड | १२७ | ३० | १७० | २०० |
| ४ | रत्नागिरी | ११४ | १४ | १६० | १७४ |
| ५ | सिंधुदुर्ग | १०५ | १२ | १४३ | १५५ |
| ६ | नाशिक | १३३ | १२ | १९१ | २०३ |
| ७ | धुळे | ४७ | ११ | ४७ | ५८ |
| ८ | जळगाव | ८१ | १३ | ९२ | १०५ |
| ९ | अहिल्यानगर | ६४ | ५ | ८५ | ९० |
| १० | नंदुरबार | ६७ | १० | ७० | ८० |
| ११ | पुणे | १५५ | ३३ | २२६ | २५९ |
| १२ | सोलापूर | ३५ | १३ | ३४ | ४७ |
| १३ | सातारा | १३८ | ३४ | १७२ | २०६ |
| १४ | सांगली | ८२ | २१ | ९३ | ११४ |
| १५ | कोल्हापूर | १०० | ३९ | ८९ | १२८ |
| १६ | छत्रपती संभाजीनगर | ३२ | ६ | ३७ | ४३ |
| १७ | बीड | ८१ | १६ | ७२ | ८८ |
| १८ | नांदेड | ८२ | २२ | १४३ | १६५ |
| १९ | धाराशिव | २५ | ९ | २३ | ३२ |
| २० | परभणी | २० | ६ | १६ | २२ |
| २१ | जालना | ३६ | ११ | २८ | ३९ |
| २२ | लातूर | ६० | १० | ५८ | ६८ |
| २३ | हिंगोली | ९ | ३ | ११ | १४ |
| २४ | अमरावती | ६९ | ११ | ९८ | १०९ |
| २५ | अकोला | ७६ | १३ | १२६ | १३९ |
| २६ | यवतमाळ | ४७ | ४ | ८६ | ९० |
| २७ | वाशिम | ५१ | १४ | ४९ | ६३ |
| २८ | बुलडाणा | ५९ | ११ | ७२ | ८३ |
| २९ | नागपूर | ८६ | १८ | ९५ | ११३ |
| ३० | वर्धा | २७ | ३ | ३८ | ४१ |
| ३१ | चंद्रपूर | ३९ | ३ | ५३ | ५६ |
| ३२ | भंडारा | ६५ | १५ | ६३ | ७८ |
| ३३ | गोंदिया | ६९ | १५ | ६९ | ८४ |
| ३४ | गडचिरोली | ५८ | ४ | १४२ | १४६ |
| | **एकूण** | **२४४४** | **४७१** | **३१२०** | **३५९१** |

टिप -१. दिनांक ३१/०१/२०२६ पर्यंत रिक्त झालेल्या जागांचा समावेश करण्यात यावा.

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ११(३) मधील तरतुदीनुसार ज्या ग्रामपंचायतीची मुदत समाप्त होण्यास (निवडणूक नोटीस प्रसिध्दीच्या दिनांकापासून) ६ महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे, अशा ग्रामपंचायतीतील रिक्त जागांचा समावेश या पोटनिवडणूक कार्यक्रमात करण्यात येऊ नये.